**महाविद्यालयीन जीवनातील सामाजिक बांधिलकी- स्वतःपासुन सुरुवात करा: प्रा. हरी नरके यांचे प्रतिपादन**

मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव येथील सोशल वेल्फेअर सेल यांच्या तर्फे दिनांक २० ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयीन जीवनातील सामाजिक बांधिलकी या विषयावर व्याख्यान आयोजीत करणय आले होते.

महाविद्यालयीन जीवनापासून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव व्हावी समाजातील तळा गाळातील बांधवांच्या समस्या जाणून घेता याव्या आणि विद्यार्थ्यांना समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचता यावे यासाठी मा प्राचार्य डॉ संजय क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सोशल वेल्फेअर सेल ची स्थापना 2015 साली महाविद्यालयात करण्यात आली आहे. या माध्यमातून गरजूंना मदत, आधाराश्रम, अनाथाश्रम ई. ठिकाणी विविध उपक्रम राबविले जातात.

भारतामध्ये ज्याप्रकारे विविध जाती धर्म आणि भाषेचे लोक राहतात त्याच प्रकारे सामाजिक विषमता सुद्धा आढळते आणि भारत स्वतंत्र झाल्यानंतर ७२ वर्षांनंतरही सुमारे ४० कोटी लोक दारिद्र्य रेषेच्या खाली म्हणजेच वंचित आहेत अनेक लोकांना पोटभर जेवण, मुलभूत शिक्षण, पायाभूत सुविधा, राहायला घर मिळत नाही. अश्याप्रकारच्या समाजात वावरत असतांना सामाजिक बदल करण्यासाठी महाविद्यालयीन तरुणांनी सामाजिक बांधिलकी आणि जबादारीचे भान ठेवलं पाहिजे त्याकरिता स्वतः पासुन आणि छोट्या गोष्टींमधून बदल करता येयील आणि आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या गोष्टींमधून आपण समाजोपयोगी कार्य करू शकतो याची जाणीव प्रा. नरके यांनी उपस्थितांना करून दिली.

सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी प्रा. नरके यांचे स्वागत करून उपस्थितांना महाविद्यालयाच्या सामाजिक उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. पवन उदावंत यांनी केले.





## Summary

Renowned Writer and Philosopher Hon. Dr. Hari Narke interacted with the students and guided them on the topic Social Responsibility during college life. He convinced the students the importance of social contribution in the overall development of the personality and social integrity of the society.